## 'काका, तुमचे पैसे पडलेत' : शेतकरी नोटा उचलण्यासाठी खाली वाकताच चोरट्यांनी २ लाखांवर मारला डल्ला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बँकेतून शेतीकामासाठी दोन लाख रुपये काढले, दुचाकीच्या डिक्कीत पैसे ठेवत होते; मात्र, त्याचवेळी चोरट्यांनी अशी शक्कल लढवली की, काही क्षणांतच शेतकऱ्याची संपूर्ण रक्कम लंपास झाली.



'काका, तुमचे पैसे पडलेत,' असे सांगत एका चोरट्याने शेतकऱ्याचे लक्ष विचलित केले, तर दुसऱ्याने दुचाकीच्या डिक्कीतून पैशांची पिशवी चोरली. प्रकाश जिवराम पाटील असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते एरंडोल तालुक्यातील उत्राण गावचे रहिवासी आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. 'काका, तुमचे पैसे पडलेत'; चोरट्यांनी अशी साधली संधी मिळालेल्या माहितीनुसार, एरंडोल तालुक्यातील उत्राण येथील शेतकरी प्रकाश जिवराम पाटील हे शेतीकामासाठी पैशांची व्यवस्था करण्याकरिता पाचोरा शहरातील भडगाव रस्त्यावरील एका बँकेत गेले होते. त्यांनी बँकेतून दोन लाख रुपये काढले. त्यानंतर ही रक्कम त्यांनी आपल्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवण्यास सुरुवात केली.

## 'एसटी'च्या भूखंडांवर व्यावसायिक इमले

### प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र निविदा बंधनकारक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा अधिकाधिक व्यावसायिक वापर करून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर विकास करण्यास आणि त्यासाठी एकूण ९८ वर्षांपर्यंतचा भाडेपट्टा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र निविदा काढणे बंधनकारक करण्यात आले आहे.

एसटी महामंडळाच्या स्वमालकीच्या, भूसंपादनातून संपादित, पूर्वीच्या रोड ट्रान्सपोर्ट विभागाकडून हस्तांतरित, भाडेकरारावरील तसेच बक्षीसपत्राद्वारे प्राप्त अशा विविध प्रकारच्या जमिनींवर 'पीपीपी'अंतर्गत विकास प्रकल्प राबविता येणार आहेत. 'पीपीपी' तत्त्वावरील विकासासाठी अंतिम टप्प्यात असलेल्या व्यवहार्य प्रकल्पांना महाराष्ट्र सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण २०२६ अंतर्गत काही सवलती देण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या निविदा, सवलत करारनामा आणि व्यवहार्य संरचनेसाठी संबंधित समितीची मान्यता घेण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक प्रकल्पाच्या अंतिम निविदेला मुख्यमंत्री स्तरावर मान्यता घेणे बंधनकारक राहणार आहे.

## पशुवैद्यकीय दवाखाना हिवरखेडच्या वतीने जागतिक अंडा दिन साजरा

### विद्यार्थ्यांना अंड्यांचे वाटप : पोषणमूल्यांबाबत जनजागृती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – जागतिक अंडा दिनानिमित्त पशुवैद्यकीय दवाखाना हिवरखेडच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलांची शाळा व कन्या शाळा, हिवरखेड येथे विद्यार्थ्यांना अंड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अंड्यांमधील प्रथिने व इतर पोषक घटकांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ.प्रमोद डोबले आणि पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रवीण सारडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. पशुधन पर्यवेक्षक मृणाली कांडलकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना अंड्यांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पोषणाविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यावेळी कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका कांता माटे, अनिता पाटील, लता लंगडे, रुबी अमिर बॅग मिर्झा, मुलांच्या शाळेतील लतिका मडघे, संगीता इंगळे, वंदना पुंड आणि वैशाली काळे उपस्थित होत्या. या उपक्रमासाठी ऋत्विक वागद्रे, निर्भय जामोदकर आणि कुणाल पवार यांनी सहकार्य केले. शिक्षक व कर्मचाऱ्यांचेही मोलाचे योगदान लाभले.

## 'ऋणानुबंध परिचय महासंमेलन' ही लोकाभिमुख सेवाभावी चळवळ

### प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांचे प्रतिपादन : मोर्शीत मोफत परिचयपत्र नोंदणी अभियानाला सुरुवात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – सर्व शाखीय माळी समाजातील विवाह इच्छुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे 'ऋणानुबंध परिचय महासंमेलन' ही लोकाभिमुख सेवाभावी चळवळ असल्याचे प्रतिपादन समाजभूषण पुरस्कारप्राप्त प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी केले.



बहुराज्यस्तरीय ऋणानुबंध परिचय महासंमेलनाचे यंदा ३१ वे वर्ष असून, रविवार, ३ जानेवारी २०२७ रोजी सकाळी १०.३० वाजता अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड येथे महासंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या महासंमेलनाची २०१९ मध्ये लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. 'शाखा तोडो, समाज जोडो' हे या चळवळीचे ध्येय असल्याचे बनसोड यांनी मोर्शी येथे आयोजित मोफत परिचयपत्र नोंदणी अभियानादरम्यान सांगितले.

महासंमेलनाच्या निमित्ताने 'ऋणानुबंध २०२७' हे विवाह इच्छुक युवक-युवतींच्या परिचयाचे पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. यासाठी मोर्शी येथील श्री समर्थ रामजी बाबा मंदिरात मोफत परिचयपत्र नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

श्री समर्थ रामजी बाबा संस्थानचे माजी अध्यक्ष केशवराव कांडलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला प्रा.श्रीकृष्ण बनसोड, रामभाऊ बुले, वसंतराव भडके, अंबादास सिनकर, प्रमोद भोजने, सागर पाटील, सुरेश केंडे, अरुण खोडस्कर, सुभाष मालपे आणि सुरेश मनगटे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

देश-विदेशांत नोकरी व व्यवसायानिमित्त स्थायिक असलेल्या तसेच माळी समाजातील सर्व शाखा व उपशाखांतील विवाह इच्छुक युवक-युवतींसाठी ही नोंदणी पूर्णपणे मोफत आहे. या अभियानात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. मोर्शी तालुक्यात या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## नवरात्रोत्सव शांततेत साजरा करण्यासाठी प्रशासनाशी समन्वय ठेवा

### जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे शांतता समितीच्या बैठकीत आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – नवरात्रोत्सव, दसरा व दिवाळी हे सण सामाजिक सलोखा आणि शांततेच्या वातावरणात साजरे करण्यासाठी उत्सव मंडळांनी प्रशासनाशी समन्वय ठेवून पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी केले. मोर्शी येथे आयोजित तालुकास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.



नवरात्रोत्सवादरम्यान महिला व मुलींची सुरक्षितता, ध्वनिवर्धक यंत्रणांचे नियम आणि उत्सवातील शिस्त यांना प्राधान्य द्यावे. युवकांनी व्यसनांपासून दूर राहावे, तसेच गरबा नृत्यादरम्यान कोणताही गैरप्रकार आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे त्यांनी सांगितले. 'ऑपरेशन कवच' अंतर्गत जनजागृती करणारे पोस्टर उत्सव मंडळांनी दर्शनी भागात लावावेत. शक्य असल्यास सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२८ दुर्गा मंडळे व १२ शारदा मंडळे, तर शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत ९७ दुर्गा मंडळे व २८ शारदा मंडळे आहेत. तालुक्यात एकूण २२५ दुर्गा मंडळे आणि ४० शारदा मंडळे नवरात्रोत्सव साजरा करीत आहेत. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मोर्शीच्या नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने होत्या. यावेळी नगरपरिषद उपाध्यक्ष डॉ. प्रदीप कुऱ्हाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, तहसीलदार सागर ढवळे, पोलीस निरीक्षक राहुल आठवले, शिरखेडचे पोलीस निरीक्षक ईश्वर वर्गे, मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, उत्सव मंडळांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. मोर्शी शहराची सामाजिक एकोप्याची परंपरा यंदाही कायम राहील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. प्रास्ताविक राहुल आठवले यांनी केले, सूत्रसंचालन विजय चौधरी यांनी केले, तर आभार उमेश पाटील यांनी मानले.

### ९ दिवस रंगणार दांडिया-गरब्याचा थरार

## वरुडमध्ये 'गरबा उत्सव'चा जल्लोष

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवरात्रोत्सवा निमित्त वरुड शहरात यंदा 'गरबा उत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत एस.एस.टर्फ अरेना, पांढुर्णा चौक, वरुड येथे दररोज सायंकाळी ७ वाजता गरबा व दांडियाचा उत्साह अनुभवता येणार आहे.



'श्रीकांत ज्वेलर्स', वरुड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या ९ दिवसीय गरबा उत्सवात सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी आकर्षक बक्षिसे, ट्रॉफी, मेगा साऊंड तसेच प्रत्येक पासवर वेलकम गिफ्ट देण्यात येणार आहे.

उत्सवात दररोज वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागींसाठी रोख पुरस्कारांची विशेष व्यवस्था करण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी ३ हजार रुपये, द्वितीय २ हजार रुपये आणि तृतीय १ हजार रुपये असे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

याशिवाय दररोजच्या उत्कृष्ट सहभागींसाठी आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार असून विविध मान्यवर व व्यावसायिक संस्थांचे सहकार्य या उपक्रमाला लाभले आहे. एस.एस.टर्फ अरेना, चिंतामणी ग्रुप आणि पीसी डान्स स्टुडिओ यांचा या आयोजनात सहभाग आहे.

या गरबा उत्सवाचे सौजन्य उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. उत्सवासाठी प्रवेश पासद्वारेच देण्यात येणार असून एका दिवसाचा प्रवेश पास २०० रुपये, तर नऊही दिवसांसाठी विशेष पास १ हजार १०० रुपये ठेवण्यात आला आहे. प्रवेशासाठी ओळखपत्र अनिवार्य असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वरुड शहरातील युवक-युवती, महिला व नागरिकांमध्ये या गरबा उत्सवाची उत्सुकता निर्माण झाली असून नऊ दिवस गरबा आणि दांडियाच्या तालावर वरुडकरांना उत्साहाचा अनुभव घेता येणार आहे.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

## मोर्शीत वीज समस्यांवरुन शेतकऱ्यांचा महावितरण कार्यालयात ठिय्या!

### डोंगर यावली, पिंपळखुटा सबस्टेशनचे काम सुरू करा | हिवरखेड केंद्राची क्षमता वाढविण्याची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वीज समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने महावितरणच्या कार्यकारी अभियंता कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि कमी दाबामुळे शेतकरी त्रस्त असून, शेतीसाठी दिवसा १२ तास अखंडित वीजपुरवठा देण्याची मागणी करण्यात आली.




डोंगर यावली व पिंपळखुटा मोठा येथील प्रस्तावित सबस्टेशनची कामे तातडीने सुरू करावीत, हिवरखेड ३३ केव्ही केंद्राची क्षमता वाढवावी आणि नादुरुस्त रोहित्रे त्वरित बदलावीत, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कार्यकारी अभियंता कासट यांना देण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रुपेश वाळके, जिल्हा सरचिटणीस हितेश साबळे, उपसरपंच कांचन कुकडे, संजय पांडव, मनीष गुडधे, विजय कडू, आकाश अमदरे, अजय मस्के, नितीन विघे यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

**आनंदी राहणे ही एक कला आहे आणि ती स्वत:च्या विचारांवर अवलंबून असते.**

# तेजीचा मोह आणि घसरणीची भीती

शेअर बाजार म्हणजे केवळ पैसा कमावण्याचे साधन नव्हे, तर संयम, अभ्यास, आर्थिक शिस्त आणि निर्णयक्षमतेची परीक्षा घेणारे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. आजच्या डिजिटल युगात मोबाईलवरील एका क्लिकवर शेअर्सची खरेदी-विक्री करता येते. बाजारातील चढ-उतार, कंपन्यांच्या कामगिरीतील बदल आणि जागतिक घडामोडी यांचा परिणाम गुंतवणूकदारांच्या निर्णयांवर होत असतो. काही वेळा बाजारात तेजीचे वातावरण निर्माण होते, तर काही वेळा घसरणीमुळे गुंतवणूकदारांच्या मनात भीती निर्माण होते. अशा परिस्थितीत विवेकाने निर्णय घेणे हीच खरी कसोटी ठरते.
भारतातील शेअर बाजारात लाखो छोटे-मोठे गुंतवणूकदार सहभागी आहेत. अनेक जण भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, घरासाठी किंवा निवृत्तीनंतरच्या गरजांसाठी गुंतवणूक करतात. मात्र, काही लोक अल्पावधीत मोठा नफा मिळिवण्याच्या अपेक्षेने बाजारात प्रवेश करतात. दुसऱ्याने एखाद्या शेअरमधून मोठा नफा कमावल्याचे ऐकून किंवा समाजमाध्यमांवरील संदेश पाहून गुंतवणूक करण्याची घाई केली जाते. हीच घाई अनेकदा आर्थिक नुकसान घडवून आणू शकते.

तेजीचा मोह आणि घसरणीची भीती

शेअर बाजारात तेजी असताना प्रत्येकाला नफा मिळेल, असा भास निर्माण होतो. शेअर्सच्या किमती वाढू लागल्या की अनेक गुंतवणूकदार कोणताही सखोल अभ्यास न करता खरेदी करतात. बाजार आणखी वर जाईल, या अपेक्षेने ते आपल्या आर्थिक क्षमतेपेक्षा अधिक पैसे गुंतवतात. मात्र, बाजाराची दिशा बदलली की हीच मंडळी घाबरून शेअर्स विकू लागतात. परिणामी, भावनिक निर्णयांमुळे नुकसान वाढण्याची शक्यता निर्माण होते. शेअर बाजारात तेजी आणि मंदी ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. कंपन्यांचे आर्थिक निकाल, व्याजदर, महागाई, देशाची आर्थिक स्थिती, परदेशी गुंतवणूकदारांची भूमिका आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी यांमुळे बाजारात चढ-उतार होत असतात. त्यामुळे बाजारातील प्रत्येक घसरण ही संकटाची आणि प्रत्येक तेजी ही मोठ्या नफ्याची हमी नसते, हे गुंतवणूकदारांनी समजून घेणे आवश्यक आहे.

अफवांचे जाळे आणि गुंतवणुकीचा धोका

आज समाजमाध्यमांवर शेअर बाजाराविषयी माहितीचा प्रचंड पूर आहे. एखादा शेअर काही दिवसांत दुप्पट होणार, अमुक कंपनीत गुंतवणूक केल्यास निश्चित नफा मिळणार किंवा विशिष्ट टिप्सच्या आधारे मोठी कमाई होणार, असे दावे अनेकदा केले जातात. मात्र, अशा दाव्यांमागील सत्यता तपासल्याशिवाय निर्णय घेणे धोकादायक ठरू शकते. विशेषतः छोट्या गुंतवणूकदारांनी अप्रमाणित संदेश, बनावट तज्ज्ञांचे दावे आणि हमखास परताव्याची आश्वासने यांपासून सावध राहिले पाहिजे. शेअर बाजारात कोणताही परतावा निश्चित नसतो. गुंतवणुकीपूर्वी संबंधित कंपनीची आर्थिक स्थिती, व्यवसायाची गुणवत्ता, कर्जाचे प्रमाण आणि भविष्यातील संधी यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. गरज भासल्यास नोंदणीकृत आर्थिक सल्लागाराचे मार्गदर्शन घेणेही उपयुक्त ठरते.




# मानसिक आरोग्याची काळजी म्हणजे स्वत:च्या आयुष्याची काळजी

**✻ आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीमध्ये शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे आहे मात्र मानसिक आरोग्याबाबत समाजात अजूनही अनेक गैरसमज, भीती आणि कलंक आहेत. मानसिक त्रास म्हणजे कमजोरी, वेडेपणा किंवा व्यक्तिमत्त्वातील दोष आहे, अशी चुकीची धारणा आजही अनेकांच्या मनात आहे. त्यामुळे अनेक व्यक्ती समस्या असूनही मदत घेण्यास टाळाटाळ करतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे. दरवर्षी १० ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' म्हणुन पाळला जातो. मानसिक आरोग्याचे महत्त्व समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे, मानसिक आजारांबाबत जागरूकता निर्माण करणे, उपचार व समुपदेशनाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे आणि मानसिक आरोग्यसेवा सर्वांसाठी उपलब्ध व्हावी, यासाठी प्रयत्न करण्याचा हा दिवस आहे.**

**✻ 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' विशेष**

**मानसिक आरोग्य म्हणजे नेमके काय?**

मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे नव्हे. व्यक्तीला आपल्या भावना समजून घेता येणे, तणावाचा सामना करता येणे, योग्य निर्णय घेता येणे, नातेसंबंध टिकवता येणे, दैनंदिन जबाबदाऱ्या पार पाडता येणे आणि आयुष्यातील चढ-उतारांशी जुळवून घेता येणे यांचा मानसिक आरोग्यात समावेश होतो. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात कधी ना कधी चिंता, दुःख, भीती, निराशा, राग, एकटेपणा किंवा तणाव येऊ शकतो, अशा भावना असणे स्वाभाविक आहे. मात्र या भावना दीर्घकाळ टिकून राहिल्या आणि त्याचा परिणाम झोप, भूक, अभ्यास, काम, नातेसंबंध किंवा दैनंदिन जीवनावर होऊ लागला तर त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

**आजच्या जीवनशैलीतील मानसिक ताण**

आज विद्यार्थी शैक्षणिक स्पर्धा, परीक्षेचा दबाव आणि करिअरच्या चिंतेत आहेत. तरुणांमध्ये नोकरी, आर्थिक अस्थिरता, सोशल मीडियाचा प्रभाव, नातेसंबंध आणि भविष्याची चिंता दिसून येते. प्रौढ व्यक्तींना कामाचा ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक समस्या आणि सामाजिक अपेक्षांचा सामना करावा लागतो. वृद्ध व्यक्तींमध्ये एकटेपणा, आरोग्यविषयक चिंता, निवृत्तीनंतरची जीवनशैली आणि सामाजिक संपर्क कमी होणे यामुळे मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मानसिक आरोग्य हा केवळ एखाद्या विशिष्ट वयोगटाचा विषय नाही. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकाच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**मानसिक त्रासाची काही संकेतचिन्हे**

एखाद्या व्यक्तीच्या वर्तनात अचानक किंवा सातत्याने बदल जाणवत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करु नये. सतत उदास राहणे, प्रत्येक गोष्टीबद्दल चिंता वाटणे, चिडचिड वाढणे, झोप न लागणे किंवा अति झोप येणे, भूक कमी-जास्त होणे, एकटेपणा वाढणे, लोकांपासून दूर राहणे, कामात किंवा अभ्यासात लक्ष न लागणे, सतत नकारात्मक विचार येणे, आत्मविश्वास कमी होणे किंवा जीवन निरर्थक वाटणे ही काही महत्त्वाची संकेतचिन्हे असू शकतात. याचा अर्थ प्रत्येक वेळी मानसिक आजारच आहे असे नाही मात्र अशा बदलांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि गरज असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

**'समुपदेशन' म्हणजे कमजोरी नव्हे**

मानसिक आरोग्याच्या समस्या लपवण्याऐवजी त्याबद्दल बोलणे हीच धैर्याची बाब आहे. जसे ताप, रक्तदाब किंवा इतर शारीरिक समस्यांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेतला जातो, तसेच मानसिक आणि भावनिक अडचणींसाठी मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक किंवा संबंधित मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत घेणे योग्य आहे. समुपदेशनामुळे व्यक्तीला स्वतःच्या भावना आणि विचार समजून घेण्यास, समस्या वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्यास, निर्णय घेण्यास आणि परिस्थितीशी प्रभावीपणे जुळवून घेण्यास मदत मिळू शकते.

**पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची**

मुलांच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलाच्या गुणांपेक्षा त्याच्या भावनिक गरजा समजून घेणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक वेळी तुलना करणे, सतत टीका करणे किंवा अवास्तव अपेक्षा ठेवणे टाळावे.

मुलाने चूक केली तर त्याला फक्त शिक्षा करण्याऐवजी त्यामागचे कारण समजून घेण्याचा प्रयत्न करावा. मुलांशी संवाद साधावा, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकावे आणि त्यांना सुरक्षित वातावरण द्यावे.

**विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य का महत्त्वाचे?**

आजच्या विद्यार्थ्यांसमोर शिक्षण आणि करिअरच्या अनेक संधी आहेत; पण त्याचबरोबर स्पर्धाही मोठी आहे. परीक्षेतील अपयश, पालकांच्या अपेक्षा, मित्रांशी तुलना, सोशल मीडिया आणि भविष्यातील करिअरची चिंता यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव वाढू शकतो. विद्यार्थ्यांना हे समजावून सांगणे गरजेचे आहे की एका परीक्षेतील गुण म्हणजे संपूर्ण आयुष्याचे मूल्यांकन नाही. अपयश हा शेवट नसून शिकण्याची संधी असू शकतो.




**सोशल मीडिया आणि मानसिक आरोग्य**

सोशल मीडिया हा आधुनिक जीवनाचा महत्त्वाचा भाग झाला आहे. त्याचा योग्य वापर माहिती, संवाद आणि ज्ञानासाठी फायदेशीर ठरू शकतो. मात्र सतत इतरांशी स्वतःची तुलना करणे, 'परफेक्ट' जीवनाच्या आभासी प्रतिमांचा पाठलाग करणे, नकारात्मक सामग्रीमध्ये अडकणे आणि स्क्रीनवर जास्त वेळ घालवणे याचा भावनिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो म्हणुन डिजिटल वापरामध्ये संतुलन राखणे, प्रत्यक्ष नात्यांना वेळ देणे आणि स्वतःच्या आयुष्याची तुलना इतरांच्या सोशल मीडिया पोस्टशी न करणे आवश्यक आहे.

**मानसिक आरोग्यासाठी आपण काय करू शकतो?**

दररोज पुरेशी झोप घेणे, नियमित शारीरिक व्यायाम करणे, संतुलित आहार घेणे, कुटुंबीय व मित्रांशी संवाद साधणे, आपल्या आवडीच्या गोष्टींसाठी वेळ देणे, ध्यान किंवा श्वसनाचे सराव करणे आणि गरज पडल्यास तज्ज्ञांची मदत घेणे यामुळे मानसिक आरोग्याची काळजी घेता येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मनात साठवून ठेवण्याऐवजी बोलणे. एखादी व्यक्ती त्रासात असल्याचे जाणवत असेल तर तिचे बोलणे मध्येच तोडू नये, तिची समस्या कमी लेखू नये आणि सगळ्यांनाच असे होते असे म्हणून तिच्या भावना नाकारु नयेत. तिचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि आवश्यक असल्यास तज्ज्ञांकडे जाण्यास प्रोत्साहित करणे ही खरी मदत आहे.

**आत्महत्येच्या विचारांकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे**

एखादी व्यक्ती जीवन संपवण्याबाबत बोलत असेल, स्वतःला इजा करण्याबद्दल संकेत देत असेल किंवा जीवन निरर्थक असल्याचे वारंवार सांगत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करु नये. अशा वेळी व्यक्तीला एकटे सोडू नये आणि तातडीने विश्वासू व्यक्ती, मानसिक आरोग्य तज्ज्ञ किंवा स्थानिक आपत्कालीन सेवेशी संपर्क साधावा. एका व्यक्तीचे ऐकून घेणे आणि योग्य वेळी मदतीपर्यंत पोहोचवणे एखाद्याचे जीवन वाचवु शकते.

**मानसिक आरोग्याबाबत समाजाची जबाबदारी**

मानसिक आरोग्याबाबतचा कलंक दूर करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, कार्यालये, रुग्णालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रशासन यांनी मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम वाढवण्याची गरज आहे. मानसिक आरोग्याबाबत चर्चा केवळ जागतिक मानसिक आरोग्य दिनापुरती मर्यादित न राहता ती वर्षभर सुरू राहणे आवश्यक आहे.

**शेवटी एकच संदेश:**

मन थकले असेल तर विश्रांती घ्या.
मन भरून आले असेल तर बोला.
समस्या मोठी वाटत असेल तर मदत घ्या.
आणि एखादी व्यक्ती त्रासात असेल तर तिचे ऐका.
मानसिक आरोग्याची काळजी घेणे म्हणजे स्वतःला कमजोर समजणे नव्हे उलट स्वतःच्या आयुष्याला आणि भावनांना महत्त्व देणे होय.
निरोगी शरीरासोबत निरोगी मनही आवश्यक आहे.
मानसिक आरोग्य हा ऐषआरामाचा विषय नसून प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत आरोग्याचा भाग आहे.
या जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आपण एक संकल्प करु या
मानसिक आरोग्याबद्दल बोलु या, गैरसमज दूर करु या आणि गरज असलेल्या प्रत्येक व्यक्तीला आधार देऊ या.



**डॉ.शिवा माया पुंडकर**
**मनोविकास तज्ञ, संमोहन तज्ञ, पुरस्कार प्राप्त समुपदेशक व प्रशिक्षक. अमरावती (वरुड)**
**७३७८८६६५५५**

# पंचा : ग्रामीण संस्कृतीचा मानबिंदू आणि साधेपणाचे प्रतीक!

बदलत्या काळातही पंचाची परंपरा जपण्याची गरज भारतीय संस्कृती ही विविध परंपरा, वेशभूषा आणि जीवनशैलीने समृद्ध आहे. या संस्कृतीमध्ये ग्रामीण जीवनाला विशेष महत्त्व आहे. गावातील माणसांचे राहणीमान, त्यांची बोलीभाषा, सण-उत्सव आणि पारंपरिक पोशाख यांतून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते. अशाच पारंपरिक पोशाखांपैकी एक म्हणजे पंचा. साधेपणा, स्वच्छता, आरामदायीपणा आणि ग्रामीण अस्मितेचे प्रतीक असलेला पंचा आजही अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

पंचा म्हणजे केवळ वस्त्र नव्हे, तर परंपरेचा वारसा पूर्वीच्या काळात ग्रामीण भागातील पुरुषांच्या दैनंदिन वेशभूषेत पंचाला विशेष स्थान होते. शेतात काम करताना, घरातील कामे करताना, धार्मिक कार्यक्रमांत सहभागी होताना किंवा गावातील सार्वजनिक कार्यक्रमांना जाताना पंचाचा वापर केला जात असे. पांढऱ्या किंवा फिकट रंगाच्या सुती कापडापासून तयार होणारा पंचा उन्हाळ्यात आरामदायी ठरतो. ग्रामीण भागातील अनेक ज्येष्ठ नागरिक आजही पंचा वापरणे पसंत करतात.



पंच्याचा संबंध केवळ कपड्याशी नाही, तर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झालेल्या जीवनपद्धतीशी आहे. पूर्वीचे लोक साध्या राहणीमानाला महत्त्व देत असत. त्यांच्या वेशभूषेत दिखाऊपणापेक्षा उपयोगिता आणि सोयीला प्राधान्य असे. पंचा हा त्याच विचारसरणीचा भाग आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातील पंचाचे महत्त्व शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. उन्हातान्हात शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवनात साध्या आणि आरामदायी कपड्यांना विशेष महत्त्व असते. पंचा हा ग्रामीण जीवनशैलीशी जोडलेला पारंपरिक पोशाख असल्याने अनेक शेतकरी त्याचा वापर करतात.

शेतातील कामे, जनावरांची देखभाल, गावातील बाजारपेठेत जाणे किंवा घरगुती कामे करताना पारंपरिक कपड्यांचा वापर केला जातो. विशेषतः सुती कापडाचा पंचा हवेशीर असल्यामुळे उष्ण हवामानात सोयीचा ठरू शकतो. त्यामुळे ग्रामीण जीवनात त्याचे स्थान आजही टिकून आहे.

आधुनिकतेच्या प्रवाहात हरवतेय का परंपरा? आजच्या काळात पाश्चात्त्य वेशभूषेचा प्रभाव वाढला आहे. तरुण पिढीमध्ये जीन्स, टी-शर्ट आणि इतर आधुनिक कपड्यांचा वापर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. बदलत्या जीवनशैलीनुसार वेशभूषेत बदल होणे स्वाभाविक आहे. मात्र, या बदलांच्या प्रवाहात पारंपरिक पोशाखांचे महत्त्व विसरले जाऊ नये.

पंचा वापरणे म्हणजे मागासलेपणाचे लक्षण नव्हे. उलट, आपल्या परंपरेचा आदर राखण्याची ती एक पद्धत आहे. आधुनिक कपडे वापरत असतानाही पारंपरिक पोशाखांचा सन्मान राखता येतो. सण, धार्मिक कार्यक्रम, सांस्कृतिक सोहळे आणि पारंपरिक समारंभांत पंचाचा वापर करून आपली सांस्कृतिक ओळख जपता येऊ शकते. संस्कृतीचे जतन ही प्रत्येकाची जबाबदारी भारतीय संस्कृतीची ओळख तिच्या विविधतेत आहे. प्रत्येक प्रदेशाची वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि जीवनपद्धती वेगळी असली, तरी त्यामागे इतिहास आणि सामाजिक अनुभव दडलेले आहेत. पंचासारख्या पारंपरिक वस्त्रांचा अभ्यास केल्यास ग्रामीण समाजाची जीवनशैली आणि बदलत्या काळातील सांस्कृतिक प्रवास समजण्यास मदत होते. नव्या पिढीला पारंपरिक वेशभूषेची माहिती देणे, ज्येष्ठांच्या अनुभवांचे महत्त्व समजावून सांगणे आणि स्थानिक संस्कृतीशी नाते जोडणे आवश्यक आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ३३ बंधपत्रित अधिपरिचारिकांच्या लढ्याला यश : प्रथम नियुक्तीपासून सेवा नियमित

## दामोदर पवार यांच्या नेतृत्वाखालील कायदेशीर लढा यशस्वी : अमरावतीत कौटुंबिक स्नेहमेळाव्यात सत्कार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – अकोला मंडळातील ३३ बंधपत्रित अधिपरिचारिकांच्या प्रदीर्घ संघर्षाला अखेर यश मिळाले असून, त्यांच्या सेवा प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित करण्याचे आदेश शासनाने निर्गमित केले आहेत. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे नेते तथा समन्वय समितीचे निमंत्रक डी.एस.पवार (दामोदर पवार) यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कायदेशीर लढ्याला यश मिळाल्याने अधिपरिचारिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ३३ अधिपरिचारिकांच्या वतीने अमरावती येथे पवार यांचा कौटुंबिक स्नेहमेळावा व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.



अकोला मंडळातील या ३३ अधिपरिचारिकांच्या सेवा प्रथम नियुक्तीपासून नियमित करण्यासाठी शासन व प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र, प्रशासनाने त्यांना सेवा परीक्षा देण्यास प्रवृत्त केले. परीक्षा पार पडल्यानंतरही त्यांच्या सेवा प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित न करता १५ एप्रिल २०१५ पासून नियमित करण्यात आल्या. त्यामुळे अधिपरिचारिकांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली होती.

या अन्यायाविरोधात अधिपरिचारिकांनी डी.एस.पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या नागपूर खंडपीठात मूळ अर्ज क्रमांक ४९२/२०२३ दाखल केला. श्रीमती ममता बांगड व इतर ३२ अधिपरिचारिकांनी महाराष्ट्र शासनाविरुद्ध हा कायदेशीर लढा उभारला. न्यायाधिकरणाने १८ जून २०२५ रोजी याचिकाकर्त्यांच्या बाजूने निकाल दिला. मात्र, विहित कालावधीत निकालाची अंमल बजावणी न झाल्याने अवमान याचिका दाखल करण्यात आली.

त्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी ४ सप्टेंबर २०२६ रोजी शासन आदेश क्रमांक न्यायिक – २०२३/प्र.क्र.७२९/सेवा –२ अन्वये ३३ बंधपत्रित अधिपरिचारिकांच्या सेवा त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या आदेशाच्या अनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ यांनी २९ सप्टेंबर २०२६ रोजी संबंधित अधिपरिचारिकांना प्रथम नियुक्तीपासून सेवा नियमित करण्याचे आदेश जारी केले.

या यशस्वी लढ्यात सरकारी–निमसरकारी शिक्षक–शिक्षकेतर समन्वय समितीचे निमंत्रक डी.एस.पवार, परिचारिका संघटनेच्या अध्यक्षा तथा राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अमरावतीच्या उपाध्यक्षा वर्षा पागोटे, तसेच याचिकाकर्त्या ममता बांगड, ममता चव्हाण आणि रुपाली राऊत यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी मनभवन रेस्टॉरंट, अमरावती येथे कौटुंबिक स्नेहमेळावा व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डी.एस.पवार यांच्यासह त्यांच्या पत्नी ज्योती पवार, मुलगा अनिकेत व सून रेणुका यांचाही सन्मान करण्यात आला. परिचारिका संघटनेच्या अध्यक्षा वर्षा पागोटे, विदर्भ प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे आणि माजी प्राचार्य दिलीपसिंग खांबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक करताना ममता बांगड यांनी उपस्थितांचे स्वागत करून या लढ्यात साथ देणाऱ्या पवार सर व वर्षाताई पागोटे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. अधिपरिचारिकांच्या एकजुटीमुळे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा विजय शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

सत्काराला उत्तर देताना दामोदर पवार म्हणाले की, ३३ अधिपरिचारिकांनी केलेला कौटुंबिक सत्कार हा त्यांच्या दृष्टीने अविस्मरणीय आहे. हा सत्कार केवळ व्यक्तीचा नसून, ३३ अधिपरिचारिकांच्या एकजुटीचा, संयमाचा आणि संघर्षाचा सन्मान आहे. आपल्याला 'आधारवड' ही उपमा देण्यात आली, यापेक्षा मोठा सन्मान कोणता असू शकतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. हा विजय कृतज्ञता, एकता, सेवा आणि संघर्षाचा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

वर्षा पागोटे यांनी बंधपत्रित अधिपरिचारिकांच्या लढ्याचा इतिहास विशद करताना त्यांच्या संघर्षातील विविध टप्प्यांची माहिती दिली. पुरुषोत्तम गावंडे आणि माजी प्राचार्य दिलीपसिंग खांबरे यांनी पवार यांच्या कर्मचारी हितासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता बांगड यांनी केले, तर आभार प्रदर्शन ममता चव्हाण यांनी केले. यावेळी रुपाली राऊत, सरला देशमुख, मीना पाटणकर, प्रणिता अंबाडकर, सपना सोनवणे, प्रिया देशपांडे, प्रतिभा माळोदे, जयश्री जामनेरकर, अश्विनी दहातोंडे, प्रणिता डगवार, नीता दराडे, पूनम निरमुडे, छाया इंगळे, प्रणिता थोरात, स्वाती दिवटे, पल्लवी वाघमारे, प्रीती बिलवाल, सरिता दरेकर, शाहीन बानो, वैशाली डोंगरे, दीपिका वाठोडकर, कालिंदा जायभाय, प्रीती चव्हाण, सारिका चांदेकर आणि शीतल धावडे यांच्यासह अधिपरिचारिका व त्यांचे आप्तस्वकीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पदवीधर मतदारसंघात जाधव विरुद्ध जाधव : शिक्षक मतदारसंघात तिरंगी सामना





(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत शुक्रवारी संपली. त्यामुळे दोन्ही मतदारसंघांतील राजकीय लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. पदवीधर मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत होणार असून, शिक्षक मतदारसंघात अपक्ष उमेदवाराच्या सहभागामुळे तिरंगी सामना रंगणार आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या डॉ.स्मिता योगेश जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या हर्षदा देशमुख–जाधव यांच्यात थेट लढत होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर उमेदवार प्रताप ऊर्फ भैय्या माने यांनी अखेरच्या क्षणी माघार घेतल्याने पक्षांतर्गत बंडखोरी शमल्याचे चित्र आहे. त्यामुळे दोन प्रमुख महिला उमेदवारांमधील लढतीकडे लक्ष लागले आहे. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे, काँग्रेसचे विद्यमान आमदार जयंत आसगावकर आणि अपक्ष उमेदवार सचिन सानप यांच्यात सामना होणार आहे. शिवसेना कडून उमेदवारी मिळवण्यासाठी आग्रही असलेल्या सानप यांनी उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या निवडणुकीत उमेदवारांचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# सोशल मीडिया वापरताना तरुणांनी काळजी घेणे महत्त्वाचे : ठाणेदार राहुल गवई, ऑपरेशन कवच कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये पोलीस स्टेशन व राष्ट्रीय सेवा योजन विभागाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्रमुख मार्गदर्शक म्हणुन ठाणेदार राहुल गवई तर प्रमुख अतिथी म्हणुन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर उपस्थित होते.

सहायक कार्यक्रमाधिकारी डॉ.तिलकचंद धोटे यांनी प्रास्ताविक करून सायबर सुरक्षा कार्यक्रमाच्या आयोजनामागील महत्त्वपूर्ण भूमिका विशद केली. प्रमुख मार्गदर्शक ठाणेदार राहुल गवई यांनी सायबर सुरक्षा, नशा मुक्ती अभियान, रस्ते सुरक्षा या विषयावर विविध उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांशी मौलिक संवाद साधला. सोशल मीडियाचा वापर तरुणांनी काळजीपूर्वक केला पाहिजे, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी आजची तरुणाई सायबर गुन्ह्याला कशी बळी पडत आहेत? याचे विदारक चित्र त्यांनी विद्यार्थ्यांपुढे मांडले. सोशल मीडियाचा वापर ज्ञानार्जन व अध्ययनासाठी केला तरच आजची पिढी सक्षम होईल, असे विचार याप्रसंगी त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे तर आभार डॉ.दिनेश खेरडे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## वं.श्री संत अच्युत महाराज यांची १४ वी पुण्यतिथी

# श्री क्षेत्र शेंदुरजनाबाजार येथे भावपुर्ण वातावरणात साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – वं.श्री संत अच्युत महाराज यांची १४ वी पुण्यतिथी गुरुग्राम श्री क्षेत्र शेंदुरजनाबाजार येथे भावपुर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

वरुडचे भुषण असलेले वं.श्री संत अच्युत महाराज व पुढे वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमुर्ती संत श्री गाडगे महाराज यांच्यासारखे गुरु व मार्गदर्शक लाभलेले व त्यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर तपस्या व सामाजिक कार्य वं.श्री संत अच्युत महाराज हे विदर्भाचे संत ज्ञानेश्वर म्हणुन ओळखल्या गेले.





विदर्भातील संतांचा परिसर म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या असे कौंडण्यपूर हे म्हणजे आई रुक्मिणी मातेचे माहेरघर होय व या भुमीमध्ये आर्वीच्या संत मायबाई महाराज, वरखेड येथे परमहंस श्री समर्थ सदगुरु आडकुजी महाराज, टाकरखेडा निवासी श्री संत लहानुजी महाराज, भारवाडी वासी श्री संत सत्यदेव महाराज गुरुकुंज मोझरी हे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज तसेच शेंदुरजना बाजार येथे वं.श्री संत अच्युत महाराज यांची महासमाधी असे हे सर्व क्षेत्रे तीर्थक्षेत्र संतभुमी म्हणुन प्रसिद्ध आहे.

वं.श्री संत अच्युत महाराज यांना मौन श्रद्धांजलीचा कार्यक्रम सकाळी ८:३० वाजता सुरुवात झाली लगेच १०:०५ मिनिटांनी भावपुर्ण वातावरणात रघुनाथ कर्डीकर गुरुजी यांनी व प्रा.सचिन जगताप यांनी निवेदन केले व भाविकांनी श्रद्धांजली अर्पण केली.

वं.श्री संत अच्युत महाराज यांच्या चौदाव्या पुण्यतिथी महोत्सव हजारो गुरुभक्तांच्या तसेच साधुसंत व मान्यवरांच्या उपस्थित पार पडला. गावातील शाळा विद्या विहार विद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीं व सर्व शिक्षकांनी पण हजेरी लावली तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रसिद्ध मराठी अभिनेते भारत गणेशपुरे यांची विशेष उपस्थिती लाभली, भावपूर्ण श्रद्धांजलीचा कार्यक्रम आटोपल्यानंतर अभिनेते भारत गणेशपुरे यांनी देशामध्ये सर्वत्र धार्मिकतेच्या नावाने होत असलेले, अवडंबरपणा व अंधश्रद्धेमुळे भक्त मंडळीचे यावर कसे शोषण केले जाते? यावर आपले परखड असे विचार व्यक्त केले तसेच वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमुर्ती संत श्री गाडगे महाराज, वं.श्री संत अच्युत महाराज यांनी आयुष्यभर सर्वधर्म, सर्व समाजाच्या उन्नतीसाठी आपला देह झिजवला असे विचार मांडलेत, विविध गावोगावचे सर्व श्री संत अच्युत महाराज सत्संग मंडळ तथा पद्मश्री जनार्दनपंत बोथे, गोपाल कडु, आमदार राजेश वानखडे त्यानंतर उपस्थित साधुसंत व मान्यवर मंडळी तथा वं.श्री संत अच्युत महाराज यांची मानसकन्या लता भोजराज देवते व जावई भोजराज देवते यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारोपीय प्रवचन ह.भ.प.सचिन देव महाराज व काल्याचे किर्तन गुरुवर्य वाणीभूषण ह.भ.प.कनेरकर जी महाराज यांनी पार पाडले. त्यानंतर सर्व भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

वरील सर्व पुण्यतिथी निमित्त घेण्यात आलेले सर्व कार्यक्रम नियोजित रित्या यशस्वीपणे पार पडण्यासाठी श्री संत अच्युत महाराज संस्थान श्री क्षेत्र शेंदुरजना बाजार (गुरुग्राम) व श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल अमरावतीचे अध्यक्ष डॉ.अनिल सावरकर व सर्व विश्वस्त मंडळ, गुरुग्राम श्री क्षेत्र शेंदुरजना बाजार मधील सर्व गावातील सामाजिक तरुण उत्सव समिती, सर्व गावकरी मंडळी येथील श्री अच्युत भक्तांनी अतिशय भावपुर्ण वातावरणात उत्तम रितीने आनंदात पार पाडला.

### महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांचा सहृय सत्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांना नुकताच शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य घाटकोपर, मुंबई यांचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'शरद रत्न शिक्षण व



जनसेवा' २०२६ चा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानिमित्ताने महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे त्यांचा सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सहृय सत्कार करण्यात आला. प्रमुख उपस्थितीत श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, प्रा.अरविंद मंगळे, प्राचार्य डॉ.दिलीप हांडे, जरुडच्या कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोपाल तडस, अनिल वऱ्हेकर हे होते.

प्रास्ताविकात प्रा.अरविंद मंगळे यांनी हा पुरस्कार श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वैभवात भर घालणारा आहे असे म्हटले तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी हर्षवर्धन देशमुख यांना मिळालेला पुरस्कार हा त्यांच्या आजपर्यंतच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दलची पोच पावती असून शिवपरिवारासाठी निश्चितच भूषणावह आहे, असे सांगितले?

यावेळी महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय वरुड, राजुरा हायस्कूल राजुरा बाजार, जरुड हायस्कूल जरुड येथील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ.चत्रभूज कदम यांनी तर आभार डॉ.अतुल वंजारी यांनी मानले.

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीबाबत संभ्रम!

### * स्पष्ट आदेश नसल्याने विद्यार्थी-पालकांमध्ये नाराजी : शिक्षण विभागाकडून स्पष्टीकरणाची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – राज्यातील दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमधील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी देण्याचा निर्णय झाल्याचे सांगितले जात असले, तरी स्पष्ट आदेश शाळांपर्यंत न पोहोचल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून २९ सप्टेंबर २०२६ रोजी परीक्षा शुल्क आकारू नये, असे पत्र पाठविण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, शुल्कमाफीमध्ये गुणपत्रिका, प्रमाणपत्र आणि प्रात्यक्षिक परीक्षांच्या शुल्काचा समावेश आहे का, याबाबत स्पष्टता नसल्याने विद्यार्थ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने तातडीने अधिकृत आदेश जारी करावेत. तसेच, आधीच शुल्क भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांना रक्कम परत करण्याबाबत स्पष्ट कार्यपद्धती जाहीर करावी, अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडून होत आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांतील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी देण्याबाबत स्पष्ट आदेश शाळांपर्यंत न पोहोचल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परीक्षा शुल्कासोबत गुणपत्रिका, प्रमाणपत्र व प्रात्यक्षिक परीक्षांचे शुल्क माफ आहे का, याबाबतही स्पष्टता नाही. शालेय शिक्षण विभागाने तातडीने अधिकृत आदेश जारी करून शुल्कमाफीची व्याप्ती स्पष्ट करावी आणि आधी शुल्क भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांना रक्कम परत करण्याची कार्यपद्धती जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

# महावितरणच्या मनमानी कारभाराविरोधात काँग्रेसचे धरणे आंदोलन

### शेतकऱ्यांच्या विविध समस्या तातडीने सोडविण्याची मागणी : कार्यकारी अभियंत्यांना घातला जाब

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – महावितरणच्या मनमानी कारभाराविरोधात तसेच शेतकरी व वीज ग्राहकांच्या विविध समस्या निकाली काढण्याच्या मागणीसाठी मोर्शी तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव विपुल भडांगे यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते व शेतकरी सहभागी झाले होते.




या आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांना पारंपरिक विद्युत जोडणीऐवजी सोलर पंपाचा आग्रह करू नये, शासनाकडे निधीची तरतूद नसल्यास डीडीएफ योजनेअंतर्गत कृषी वीजजोडणी द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या. मोर्शी तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांच्या घरांवरून जाणाऱ्या उच्चदाब व लघुदाब वीजवाहिन्या स्थलांतरित करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (डीपीडीसी) योजनेतून तातडीने प्रस्ताव पाठविण्याची मागणीही करण्यात आली.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांच्या कृषिपंपांचा वीजपुरवठा खंडित करू नये, माफ करण्यात आलेल्या कृषिपंपांच्या वीजबिलांची रक्कम बिलातून वजा करावी, तसेच शेतकऱ्यांना नियमित व अखंडित वीजपुरवठा करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. वीजपुरवठ्यात बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्ती करून वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. घरगुती वीज ग्राहकांना स्मार्ट मीटरमुळे जास्तीची बिले येत असल्याच्या तक्रारींची दखल घेऊन वीजबिलांबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव विपुल भडांगे, मोर्शी शहर काँग्रेस अध्यक्ष तथा नगरसेवक भूषण कोकाटे, महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष अल्पजा बडासे, महिला काँग्रेस अनुसूचित जाती सेलच्या तालुकाध्यक्ष रमा इंगळे, सेवादल अध्यक्ष निलेश तट्टे, वासुदेव तायवाडे, गोलू शेख, मुरलीनाना डहाणे, संजय पांडव व संदीप भडादे यांनी संबोधित केले.

यावेळी पंकज विधळे, बबिता बोरेकर, सुनीता कुमरे, सविता ठाकरे, पुष्पा परतेती, यादवराव चोपडे, वसीम कुरेशी, अमर कदम, प्रकाश काळे, जावेद पठाण, हितेश साबळे, सुहासराव ठाकरे, केशवराव पांडे, गजानन ठाकरे, प्रफुल्ल चिखले, सूरज अवचार, अन्सार कुरेशी, देवेंद्र गोरडे, ओम चांगोले, नितीन लुंगे, बबलू अंधारे, अभि झोड, सय्यद फैझान, दादाराव वानखडे, पंकज वाघमारे, यश पांडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुर्गा मिरवणुकीमध्ये बँडपार्टी, ढोल-ताशा वाजविण्यास परवानगी द्या

### अखिल माकोडे यांचे नेतृत्वात आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचेकडे साकडे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – दुर्गा विसर्जन मिरवणुकीमध्ये दरवर्षीप्रमाणे बँड पार्टी, ढोल-ताशा वाजविण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी अखिल माकोडे यांचे नेतृत्वात आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचेकडे एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुक्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दुर्गा विसर्जन उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात येत आहे.



दरवर्षी दुर्गा विसर्जन मिरवणुकीमध्ये बँड पार्टी, ढोल-ताशा व डीजे साऊंडच्या माध्यमातून देवीचा निरोप दिला जातो. ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे.

मात्र, यावर्षी दुर्गा विसर्जन मिरवणुकीमध्ये बँड पार्टी व डीजे साऊंड वाजविण्याची परवानगी नाकारण्यात आल्याने नागरिक, दुर्गा मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

या विषयात आपण लक्ष घालुन संबंधित प्रशासन व पोलीस विभागाशी चर्चा करावी आणि दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा दुर्गा विसर्जन मिरवणुकीमध्ये बँड पार्टी, ढोल-ताशा व डीजे साऊंड वाजविण्यास नियमानुसार परवानगी मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे. आम्ही ध्वनीप्रदूषणासंबंधी लागू असलेले नियम, ध्वनीमर्यादा, वेळेच्या बंधनांच, शासन व पोलीस प्रशासनाच्या सर्व कायदेशीर आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यास तयार आहोत. उत्सव शांततेत, शिस्तबद्ध पद्धतीने व कायदा-सुव्यवस्था राखून पार पाडण्याची आमची पूर्ण तयारी आहे. आमच्या धार्मिक भावना व दरवर्षीच्या परंपरेचा विचार करुन दुर्गा मंडळांना योग्य ती परवानगी मिळवुन देण्यासाठी सहकार्य करावे, अशी मागणी अखिल माकोडे, पवन माळोदे, दिपक ठाकरे, युगल बेलसरे, साजन शेळके, नितीन अंतुकर आदींनी केली आहे.

# राज्यातील १४ संस्थांतील रिक्त पदांचा प्रश्न उच्च न्यायालयात; चार लाख स्पर्धा परीक्षा उमेदवारांचे भवितव्य टांगणीला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह (एमपीएससी) राज्यातील १४ वैधानिक आणि घटनात्मक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याचा प्रश्न आता मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला आहे. या रिक्त पदांमुळे सुमारे चार लाख स्पर्धा परीक्षा उमेदवारांच्या भवितव्यावर परिणाम होत असल्याचा दावा करत, सर्व संबंधित संस्थांमधील




पदे तातडीने भरण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. एमपीएससी विद्यार्थी आंदोलनातील कार्यकर्ते विवेकानंद पाटील यांनी अ‍ॅड. असीम सरोदे यांच्यामार्फत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत ही याचिका दाखल केली आहे. रिक्त पदांमुळे भरती प्रक्रिया, तक्रार निवारण आणि अर्धन्यायिक कामकाजावर परिणाम होत असून, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दा याचिकेत मांडण्यात आला आहे. याचिकेतील आकडेवारी नुसार, एमपीएससीच्या मंजूर २७० पदांपैकी ९२ पदे रिक्त आहेत.

# मोर्शी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती घोषित

### शेतकऱ्यांना विविध सवलती लागू : तहसीलदार सागर ढवळे यांचे विभागांना निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – कमी पर्जन्यमानामुळे मोर्शी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती (ट्रिगर-१) घोषित करण्यात आली आहे. शासनाच्या निर्णयानुसार शेतकरी व नागरिकांना दिलासा देण्यासाठी विविध सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात तहसीलदार सागर ढवळे यांनी संबंधित विभागांना आवश्यक निर्देश दिले आहेत.



यामध्ये बाधित क्षेत्रातील शेतजमिनीचा महसूल माफ करणे, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जवसुलीस स्थगिती, कृषिपंपांच्या चालू वीजबिलात सवलत, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे आणि रोजगार हमी योजनेतील कामांना गती देणे आदी उपाययोजनांचा समावेश आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था आणि आवश्यक ठिकाणी चारा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच पीक परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी तातडीने पंचनामे व सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सर्व संबंधित विभागांनी या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश तहसीलदार सागर ढवळे यांनी दिले आहेत.

# स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी वरुडचा अजिंक्य देशमुख पुण्यात रोहितदादा पवार यांच्याशी विद्यार्थी व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी वरुड तालुक्यातील अजिंक्य देशमुख यांनी पुण्यात जाऊन विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. यावेळी त्यांनी युवा नेते रोहितदादा पवार यांच्याशी सुमारे १५ ते २० मिनिटे चर्चा करून स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या समस्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले.






या आंदोलनात एमपीएससीच्या अध्यक्षांचा राजीनामा, ७० हजार पदांची मेगा भरती तातडीने सुरू करणे, स्वच्छ प्रतिमेच्या नवीन अध्यक्षांची नियुक्ती, परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेणे आणि विविध परीक्षांमधील अनियमिततेच्या आरोपांची निष्पक्ष एसआयटी चौकशी करणे, अशा मागण्या मांडण्यात आल्या. तसेच राजस्थान सरकारच्या धर्तीवर १०० रुपयांच्या कोर्ट फीवर वर्षभरातील सर्व परीक्षा घेण्याची मागणीही करण्यात आली.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीत स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. त्यांच्या मेहनतीला न्याय मिळावा, भरती प्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि विद्यार्थ्यांचा परीक्षा यंत्रणेवरील विश्वास कायम राहावा, यासाठी त्यांच्या प्रश्नांना पाठिंबा देणे आवश्यक असल्याची भूमिका अजिंक्य देशमुख यांनी मांडली.

वरुड तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसोबतच शेतकरी कुटुंबांच्या समस्यांवरही यावेळी चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांचे हक्क आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठविण्याच्या उद्देशाने या भेटीतून प्रयत्न करण्यात आला.

शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी

# बालापेठ येथील दोघांविरुध्द गुन्हा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी शेंदुरजनाघाट येथील बालापेठ येथील दोघांविरुध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, ८ ऑक्टोंबर रोजी दुपारी २.३० च्या सुमारास भुमापक निधी कुऱ्हाडे व इतर कर्मचारी हे दायवाडी शेतशिवारातील गट क्र५२ मध्ये त्यांचे शासकीय कार्य पार पाडीत असतांना मोहम्मद खालीद मोहम्मद



साबीर (४०) तसेच अज्ञात आरोपी दोन्ही रा.बालापेठ शेंदुरजनाघाट यांनी संगणमत करुन निधी यांना अश्लिल भाषेत शिविगाळ करुन त्यांचेसह व त्यांचे सहकारी कर्मचारी यांना धक्काबुक्की करुन मारहाण केली तसेच मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी भुमापक निधी नामदेवराव कुऱ्हाडे रा.हरीहर अपार्टमेंट, चैतन्य कॉलनी अमरावती ह.मु.सुर्या कॉलनी वरुड यांचे फिर्यादीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी मोहम्मद खालीद मोहम्मद साबीर (४०) तसेच अज्ञात आरोपी दोन्ही रा.बालापेठ शेंदुरजनाघाट यांचेविरुध्द १३२, १२१ (१), २९६, ११५ (२), ३५१ (२), ३ (५) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे?

# पेठपुरा येथे गोमांस जप्त : मोर्शी पोलिसांची कारवाई

## गोमांस व कत्तलीचे साहित्य मिळून १८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – मोर्शी तालुक्यातील पेठपुरा येथे गोवंश जनावराची अवैध कत्तल करून विक्रीच्या उद्देशाने गोमांस बाळगल्याच्या माहितीवरून मोर्शी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत गोमांसाचे तुकडे आणि कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण १८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी रियाज अहमद अब्दुल अजीज (वय ४६, रा.पेठपुरा) याच्याविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

९ ऑक्टोबर रोजी पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण हे पथकासह गस्तीवर असताना त्यांना पेठपुरा येथील एका घरात गोमांस ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी तपासणी केली असता गोमांस आणि कत्तलीचे साहित्य आढळून आले. पशुधन विकास अधिकाऱ्यांनी मांसाचा नमुना रासायनिक तपासणीसाठी राखून ठेवला. उर्वरित दुर्गंधीयुक्त मांस नगर परिषद मोर्शीच्या सहकार्याने पंचांसमक्ष जमिनीत पुरून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३२५, २२१, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील संबंधित



कलमे तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली, मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण व पोलीस पथकातील कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# महाराष्ट्र राज्य गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशन पदाधिकाऱ्यांनी घेतली स्व.सुनिल वागद्रे यांच्या कुटूंबियांची भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शासनाकडून विविध विकासकामांची कोट्यवधी रुपयांची देयके प्रलंबित असल्याच्या पार्श्वभूमीवर वरूड येथील शासकीय कंत्राटदार सुनील वागद्रे यांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या घटनेमुळे कंत्राटदार वर्गात हळहळ व्यक्त होत असून, शासनाकडील प्रलंबित देयकांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान सायंकाळच्या सुमारास महाराष्ट्र राज्य गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनच्या



पदाधिकाऱ्यांनी वागद्रे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले.

सुनिल वागद्रे यांनी शासकीय विभागांमार्फत विविध विकासकामे व बांधकामांची कामे केली होती. मात्र, कामे पूर्ण करुनही संबंधित देयके मोठ्या कालावधीपासून प्रलंबित असल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात आले. या आर्थिक ताणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र राज्य गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी वागद्रे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधून घटनेची माहिती जाणुन घेण्यात आली. प्रलंबित शासकीय देयकांमुळे कंत्राटदारांवर निर्माण होणाऱ्या आर्थिक अडचणींबाबतही पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली.

शासकीय कामे वेळेत पूर्ण करुनही त्याची देयके वेळेवर मिळत नसल्याने अनेक कंत्राटदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. कंत्राटदारांची प्रलंबित बिले तातडीने निकाली काढावीत, अशी मागणी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

सुनिल वागद्रे यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले असून, या घटनेने कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे चर्चेत आला आहे. शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रलंबित देयकांचा प्रश्न मार्गी लावावा आणि कंत्राटदारांना वेळेत देयके मिळण्यासाठी ठोस व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विश्राम येथुन राज्याचे आदिवासी मंत्री उईके यांचेशी संपर्क साधून येत्या मंगळवारपर्यंत सुनिल वागद्रे यांचे शिल्लक असलेले संपुर्ण देयक काढून देण्याचे आश्वासन दिल्याचे प्रविण उंबरकर यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्र कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनचे अध्यक्ष प्रविण उंबरकर, वर्धा जिल्हा कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष किशोर मिटकरी, सदस्य निरंजन शर्मा, विदर्भ बिल्डर असोशिएशनचे अध्यक्ष नितीन डहाके, अमरावती जिल्हा कंत्राटदार संघटनेचे सदस्य विनोद अजमिरे, अमरावती जिल्हा कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष रविंद्र गुल्हाने, सचिव प्रमोद काकडे, कोषाध्यक्ष गापाल राठी यांचेसह तालुक्यातील निळकंठ मुरुमकर, नितीन खेरडे, किशोर गोळे, प्रितिश उर्फ प्रदीप अकर्ते, अनिल शिरभाते, दिपक बोंदरे, सचिन वायकूळ, रोशन कळमकर, अनिल कनाटे, नरेंद्र पावडे, प्रतिक खेरडे, शुभम पावडे, आदित्य नेपटे, आशय शंभरकर व वरुड तालुक्यातील सर्व शासकीय कंत्राटदार उपस्थित होते.

# प्रकृती बिघडली, तिघांचे उपोषण मागे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर आपल्या हक्कांच्या मागण्यांसाठी उपोषणाला बसलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) तीन विद्यार्थ्यांची प्रकृती वेगाने खालावल्याने त्यांनी अखेर गुरुवारी मध्यरात्री आपले उपोषण मागे घेतले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सलग नवव्या दिवशीही सुरू आहे. सलगच्या अन्नत्यागामुळे प्रकृती चिंताजनक बनलेल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून ज्येष्ठांच्या आवाहनानुसार शुक्रवारी हे



उपोषण मागे घेण्यात आले असले, तरी एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही, असा इशारा रोहित पवार यांनी दिला आहे.

पुण्यात तणावाचे वातावरण दरम्यान, या आंदोलनामुळे पुण्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी काल आंदोलनस्थळी दाखल होऊन एस. एम. जोशी पूल तातडीने मोकळा करण्याच्या सूचना आंदोलकांना दिल्या आहेत.










